वर्ष २०१८ ः २०१९ ः अहवाल

फाऊंडेशन कोर्स इन हयुमन राईट एन्ड एडयुकेशन

माहे १ डिसेंबर पासून फाऊंडेशन कोर्स इन हयुमन राईट एन्ड एडयुकेशन हया कोर्सला सुरवात. या कोर्ससाठी एकुण ५५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. दर वर्षि हया कोर्सच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागृकता, सामाजिक जाणिव जागृति व जगण्याचा आत्मविश्वास निर्माण केला जात असतो.

तसेच या कोर्सच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना अभ्यास दौरा देखिल आयोजीत केला जात असतो. हया वर्षि दिनांक ५जाने २०१९ रोजी "मु.पो.भोरस ता.चाळीसगांव येथिल बेलगंगा साखर कारखान्याला भेट देऊन तेथिल कामगारांची स्थिती जाणुन घेण्याचा व त्यांच्या हक्क व अधिकाराचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला. त्यासाठी बेलगंगा साखर कारखान्याचे विद्यमान चेअरमन मा.दादासाहेब चित्रसेन पाटील यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.तसेच या वेळी सकाळ विभागीय कार्यालयाचे संपादक श्री.आनंन शिंपी हे देखिल विद्यार्थ्यांशि हितगुज करण्यासाठी आले होते.

तसेच दि. १७ जाने २०१९ रोजी या कोर्सच्या माध्यमातुन क्षेत्रिय अभ्यास दौरा चाळीसगांव पालिस स्टेशन येथे आयोजीत करण्यात आला.तेथे विद्यार्थ्यांनी कारागृहातील कैदयांच्या व्यवस्थेची पहाणी केली.कैदयांच्या हक्क व अधिकाराची काळजी पालिस विभागा कडून कशाप्रकारे घेतली जाते याचाही अभ्यास विद्यार्थ्यांनी केला.

तसेच दि.२१ जाने २०१९ रोजी कोर्सच्या विद्यार्थ्यांची चाळीसगांव दिवाणि व फौजदारी न्यायालयाला भेट घडवून आणली. विद्यार्थ्यांनी कौटोंबीक हिंसाचार झालेल्या महिलेचा दावा न्यायालयासमोर सुनावणीसाठी आला असता प्रत्यक्ष बघीतला व अनुभवला.या प्रसंगी जेष्ठ विधि तज्ञ ॲड.के.आर.सुराणा यांनी विद्यार्थ्यांना बहुमुल्य मार्गदर्शन केले.

तसेच कोर्सच्या मुलांना संशोधनाची जाणिव व्हावी यासाठी व महिलांच्या हक्क अधिकाराची जाणिव व्हावी यासाठी बी.पी.आर्ट, एस.एम.ए.सायन्स व के.के.सी कॉमर्स कॉलेज चाळीसगांव येथे राज्य महिला हक्क आयोगाने आयोजीत केलेल्या चार्चासात्रासाठी जास्तीत जास्त कोर्सच्या विद्यार्थीनीना नेण्यात आले.तेथे महिला हक्क आयोगाच्या सदस्या मा.ताई साहेब देवयानी ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना बहुमुल्या मार्गदर्श केले.

१० ते १२ मार्चच्या दरम्यान विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आली व ३० एप्रिल रोजी विद्यार्थ्यांना प्रमाण पत्राचे वाटप करण्यात आले.

हा कोर्स माहे डिसेंबर २०१८ ते माहे मार्च २०१९ या दरम्यान आयोजीत करण्यात आला होता. या कोर्ससाठी

१. प्रा.डॉ.आर.पी.निकम
२. प्रा.डॉ.आर.बी.चव्हाण
३. प्रा.सौ.मंगला सुर्यवंशी

यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. मा. प्राचार्य डॉ.एस.आर.जाधव यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळे हा कोर्स गेल्या पाच वर्षा पासून यशस्वी कार्यरत होता.या कोर्सचे हे शेवटचे वर्ष

समन्वयक

फाऊंडेशन कोर्स इन हयुमन राईट एन्ड एडयुकेशन